“महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड विभाग”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड

“वाणिज्य आणि व्यवस्थापन” या विद्याशाखे अंतर्गत
वाणिज्य विषयातील पीएच.डी. पदवीसाठी संशोधनाची रूपरेषा

संशोधक

रिंदकवाले अजय बालाजी

एम. कॉम. सेट. नेट.

सहाय्यक प्राध्यापक, (वाणिज्य विभाग)

श्री शिवाजी कॉलेज, कंधार

संशोधन मार्गदर्शक

डॉ. एन. एच. आवडे

एम. कॉम. एम. फिल. पीएच.डी.

सहयोगी प्राध्यापक (वाणिज्य विभाग)

ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय, वसंतनगर

ता. मुखेड जि. नांदेड

अनुक्रमणिका

अ. क्र	शिर्षक	पृष्ठ क्र.
१	प्रस्तावना	३
२	साहित्याचा आढावा	५
३	संशोधनाचे उद्देश	६
४	संशोधन अभ्यासाचे महत्व	७
५	संशोधनाची गृहीतके	८
६	संशोधन आराखडा	८
७	संशोधन पद्धती	९
8	संशोधनाची व्याप्ती	१०
९	संशोधनाची मर्यादा	१०
१०	संदर्भ	११

“महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड विभाग”

प्रस्तावना :

एसटीची सेवा "गाव तेथे एसटी","रस्ता तेथे एसटी" या ब्रीदवाक्यानुसार खेड्यापासून शहरापर्यंत विस्तारलेली आहे. महाराष्ट्रात एकूण ३१ विभागातून एसटीचे विभागीय कामकाज होते. त्याचप्रमाणे एसटी महामंडळाकडून आंतरराज्यीय सेवा पुरविली जाते. ह्या सेवेचा गुजरात,मध्य प्रदेश,कर्नाटक, आंध्र प्रदेश,तेलंगणा व गोवा इ. राज्यांत विस्तार झाला आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ जे की एक राज्य परिवहन उपक्रम आहे हे सर्वात मोठ्या राज्य मार्ग परिवहन महामंडळांपैकी एक आहे. सार्वजनिक क्षेत्रातील आर्थिक आणि विश्वासार्ह प्रवासी रस्ते वाहतूक सेवा सामान्य ते लक्झरी प्रवासी लोकांपर्यंत बस सेवांची विस्तृत श्रेणी देते. संपूर्ण महाराष्ट्र राज्य आणि शेजारील राज्यांमध्ये प्रवासी वाहतूक सेवा प्रदान करते आणि प्रवाशांच्या फायद्यासाठी दिवस आणि रात्री दोन्ही सेवा प्रदान करते.

रस्ते ही देशाची नसा मानली जाते ज्याद्वारे वस्तू आणि लोक एकत्र येतात, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातात हा एक सोयीस्कर साधन आहे जो लोकांना घरोघरी जाण्यास मदत करतो. वाहतुकीमध्ये हवाई आणि रेल्वेचे जाळे वाढत असले तरी रस्ते वाहतूक अजूनही तितकेच महत्वाचे साधन आहे. प्रामुख्याने डोंगराळ भागासारख्या सुलभ प्रवासासारख्या फायद्यांमुळे प्राधान्य दिले जाते. इतर प्रवासाच्या तुलनेत स्वस्त किंमत आणि कमी अंतर प्रवास करण्यासाठी सुलभ मानले जाते. भारतासारख्या देशात जेथे ग्रामीण लोकसंख्या शहरी लोकसंख्येच्या तुलनेत जास्त आहे तेथे रस्ते वाहतूक सोयीस्कर दराने वाहतुकीच्या गरजा पूर्ण करते.

आज कित्येक वर्षापासून रस्ते वाहतूक हे वाहतुकीचे महत्त्वाचे आणि परवडणारे साधन म्हणून सिद्ध झाले आहे परंतु कर्मचाऱ्यांकडे दुर्लक्ष होत

आहे. प्रामुख्याने कर्मचाऱ्यांकडे लक्ष वेधून देणे खूप महत्वाचे आहे. यामध्ये एस. टी. चालक आणि कंडक्टर यांची महत्त्वाची भूमिका आहे. हे कर्मचारी ऊन, वारा, आणि पाऊस मध्ये आपले कार्य प्रामाणिकपणे पार पाडत असतात लोकांना सुरक्षितपणे त्यांच्या ठिकाणी सोडण्याचे काम बस सेवेच्या माध्यमातून हे कर्मचारी करत असतात. आज आपण पाहतो की खेड्यांना जोडण्याचे काम हे बससेवा करते. बससेवा खेड्यापर्यंत पोहचल्याने हजारोच्या संख्येने मुले बसचा पास काढून कमी दरात बसचा प्रवास करून शाळेला जातात. एस. टी. बस हे विद्यार्थ्यांसाठी एकमेव वाहतुकीचे साधन झाले आहे. परंतु आज आपण पाहतो की या कर्मचाऱ्यांना आपल्या स्वतःच्या मुलांना शिक्षण देण्यासाठीपण किती संघर्ष करावा लागत आहे. कारण कर्मचाऱ्यांची सर्वात मोठी अडचण म्हणजे त्यांच्या कामाच्या मोबदल्यात त्यांना दिला जाणारा तुटपुंज असा पगार आहे. आपण दोन वर्षापूर्वीच पहिले या कर्मचाऱ्यांचे काय हाल होत चाललेली आहे जेंव्हा या कर्मचार्यांनी आपल्या हक्कासाठी, आपल्या कुटुंबासाठी, आपल्या पगारामध्ये वाढीसाठी उपोषण केल होत तेंव्हा जनतेसमोर या कर्मचाऱ्यांची खरी परिस्थिती निदर्शनास आली होती. कर्मचाऱ्यांना आपल्या मुलांची शाळेची फीस देणपण अवघड होते त्याच्या कुटुंबाच्या मुलभूत गरजासुद्धा पूर्ण करणे हे त्यांच्या साठी किती कठीण होत आहे हे पाहण्यात आले होते आणि हेच कारण होते की कित्येक एस.टी. कर्मचाऱ्यांनी त्या उपोषणामध्ये आत्महत्या केली. कर्मचारी त्यांच्या आर्थिक अडचणीमुळे समाजामध्ये चांगल्या दर्जाची राहणीमान मिळत नाही. राज्यातील इतर कर्मचाऱ्यांना योग्य वेळेवर पगार दिला जातो आणि त्यांची पगारवाढही वेळेवर केली जाते परंतु एस.टी. च्या कर्मचाऱ्यांना त्यांना दिला जाणारा पगार अगोदरच तुटपुंज असूनही त्यांना ज्या वेळेत पगार वाढवायचा असतो तोच वेळेवर वाढवला जात नाही नेहमी त्यामध्ये विलंब केले जाते म्हणून हे कर्मचारी ते ज्या आर्थिक परीस्थित जगत आहे त्या परिस्थितून तो वर येत नाही. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ साठी आणि सरकार साठी एस.टी. कर्मचारी हेच त्यांची संपत्ती आहे. आणि अशी हे संपत्ती टिकवून ठेवण्यासाठी आणि त्या कर्मचाऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा विकास करण्यासाठी प्रयत्न करणे खूप महत्वाचे आहे आणि यासाठी आपण

सर्वात अगोदर एम.एस.आर.टी.सी. च्या कर्मचाऱ्यांचा आर्थिक परिस्थितीचा आढावा, कर्मचाऱ्यांच्या आर्थिक घटकांचा परिणाम त्याच्या सामाजिक परिस्थितीवर कसा होत, सरकार किंवा ॐ महामंडळ आपल्या कर्मचाऱ्यांसाठी कोणत्या आर्थिक योजना राबवत आहे, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबासाठी कोणत्या सोयीसुविधा पुरवत आहे याचा अभ्यास करण्याची गरज आहे हे आपण या संशोधन अभ्यासामध्ये पाहणार आहोत.

साहित्याचा आढावा:

१ परदेशी राजेंद्र यांनी “महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सेवा गुणवत्तेचा अभ्यास: विशेष संदर्भ अहमदनगर” या विषयावर संशोधन केले आहे. यामध्ये राजेंद्र यांनी एस. टी. महामंडळाकडून दिली जाणारी सेवा गुणवत्ता यांचा अभ्यास केलेला आहे.

२ सोनटक्के संतोष यांनी “महाराष्ट्रातील राज्य मार्ग परिवहन महामंडळ मानव संसाधन व्यवस्थापन पद्धतींचा अभ्यास: विशेष संदर्भ नांदेड” या विषयावर आपले संशोधन केले आहे. या संशोधनात त्यांनी एस. टी. कर्मचाऱ्यांची भरतीचे धोरण, मानव संसाधन नियंत्रण यावर भर दिला आहे.

३ हात्ते अर्चना यांनी “नांदेड विभागातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कर्मचाऱ्यांच्या नोकरीतील समाधानाचा अभ्यास” या विषयावर संशोधन अभ्यास केला आहे. या संशोधन अभ्यासात त्यांनी एस. टी. कर्मचाऱ्यांच्या कामाचे त्यांच्या मानसिकतेवर होणारे परिणाम व त्यांची कार्यक्षमता यावर भर दिला आहे.

४ दुबळ उर्मिला यांनी “पश्चिम महाराष्ट्रातील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आणि महानगरपालिका परिवहन महामंडळ उपक्रमांमधील कल्याणकारी आणि मनोरंजनाच्या सुविधांचा अभ्यास” यावर आपले संशोधन केले आहे. त्यांनी या संशोधनात कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा व त्यांच्या साठी असलेल्या कल्याणकारी योजना यावर भर दिले आहे.

५ मारोतीराव गवळी पांडुरंग यांनी “महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संचालन व्यवस्थापनाचा अभ्यास” या विषयावर आपले संशोधन केले आहे. त्यांनी यामध्ये एस. टी. महामंडळ कशा प्रकारे कार्य करते व त्याचे संचलन क्ष प्रकारे केले जाते यावर भर दिले आहे.

संशोधन समस्या:

संधोधनाचा आढावा घेताना असे लक्षात आले की, बरेच संशोधकांनी एस. टी. महामंडळावर संशोधन अभ्यास केला आहे. परंतु कुणीही त्यांच्या आर्थिक समस्या यावर अभ्यास केला नाही. एस. टी. महामंडळातील कर्मचाऱ्यांचा सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे त्यांची आर्थिक आणि सामाजिक आहे. कर्मचारी आपल्या गरजा त्यांच्या पगारीतून कशा प्रकारे भागवत आहे व त्यांना आपले कौटुंबिक जीवन जगताना त्यांना येणाऱ्या अडचणी यावर सुद्धा अभ्यास करणे गरजेचे आहे. काही संशोधकांनी त्यांच्या मानसिकतेचा त्यांच्या कार्यावर होणारा परिणाम यावर अभ्यास केला परंतु त्यांनी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक अडचणी याचा विचार केला नाही म्हणून “एम.एस.आर. टी.सी. च्या कर्मचाऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड”हा विषय निवडलेला आहे.

संशोधनाचे उद्देश :

या संशोधन अभ्यासाचा उद्देश सध्याच्या परिस्थितीत कर्मचाऱ्यांची आर्थिक परिस्थिती कशी आहे आणि त्यांना सामाजिक जीवन जगताना येणाऱ्या अडचणी दर्शविणे हे आहे. प्रामुख्याने खालील मुद्द्यांच्या सहाय्याने आपणास नेमके या संशोधन अभ्यासाचे उद्देश स्पष्ट करता येईल.

१ कर्मचाऱ्यांच्या इतर स्त्रोतांसह उत्पन्नाचा अभ्यास करणे.
२ कर्मचाऱ्यांची गुंतवणूक आणि खर्च यांचा अभ्यास करणे.
३ कर्मचाऱ्यांची आर्थिक स्थिती विकसित करण्यासाठी राज्य सरकारने राबविलेल्या विविध धोरणांचा अभ्यास करणे.

४ कर्मचाऱ्यांच्या सामाजिक-आर्थिक समस्यांचा अभ्यास करणे.
५ नांदेड विभागातील कर्मचाऱ्याची कामकाजाची व कार्यक्षमतेची स्थिती ओळखणे.
६ कर्मचाऱ्यांच्या आर्थिक समस्यांवर उपाय सुचवणे.

संशोधन अभ्यासाचे महत्व :

कोणत्याही राष्ट्राची मानव संसाधनाचे प्रमाण हे तिची अर्थव्यवस्था किती वेगाने विकसित होते हे ठरवते. मानवी संसाधनांचे व्यवस्थापन पारंपारिक आणि आधुनिक दोन्ही अर्थव्यवस्थांसाठी खरे तर फायदेशीर आहे. आर्थिकदृष्ट्या स्थिर असलेल्या कोणत्याही संस्थेसाठी तिची लोकसंपदेचे यशस्वीपणे व्यवस्थापन करणे आवश्यक झाले आहे. संस्थेच्या यशासाठी आर्थिक कामगिरी तितकीच महत्त्वाची असते. बरेच लोक शहरे, आणि महानगरांमध्ये प्रवास करण्यासाठी बस सेवा वापरतात,जेथे ते बसच्या सर्व सुविधांचा लाभ घेऊ शकतात. आर्थिक स्थैर्य टिकवून ठेवण्यासाठी बस या मूलभूत गरज बनतात कारण त्या उच्च दर्जाची सेवा देतात आणि ग्राहकांचे समाधान करण्याचे उद्दिष्ट ठेवतात.

कर्मचारी ही कोणत्याही सेवा उद्योगाची एक मोठी संपत्ती असते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी बनवलेली आर्थिक धोरणे आणि त्यांच्या वेतन श्रेणीत सुधार करणे आवश्यक आहे. सध्याचा अभ्यास हा नांदेड विभागातील कर्मचाऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक स्तिथीवर केंद्रित करते. एमएसआरटीसीच्या सेवा रस्ते प्रवासी वाहतूक ही ग्रामीण भागातील महत्त्वाची सेवा आहे. ही महत्त्वाची सेवा वाहतुकीची पूर्तता बसने केली जाते. कोणतीही सेवा उद्योग असल्यास जागतिकीकरण आणि खाजगीकरण येत असल्याने स्पर्धेला तोंड द्यावे लागते. व्यवसायाच्या प्रत्येक पैलूमध्ये अस्तित्व टिकविणे महत्वाचे असते. म्हणून MSRTC ला आपल्या

कर्मचाऱ्यांच्या आर्थिक आणि सामजिक स्तिथीचा विचार करून त्यांच्या अडचणी सोडविणे हे महत्वाचे आहे.

संशोधनाची गृहीतके :

१ कर्मचाऱ्यांचा खर्च उत्पन्नापेक्षा जास्त आहे.
२ कर्मचाऱ्यांचे जीवनमान घसरत चाललेले आहे.
३ कर्मचाऱ्यांना आर्थिक समस्यांना तोंड देत आहेत.

संशोधन आराखडा:

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - संशोधनाचा आढावा

प्रकरण तिसरे - एस. टी. महामंडळाचे कर्मचाऱ्यांसाठीचे आर्थिक धोरणे

प्रकरण चौथे - एस.टी. कर्मचाऱ्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती

प्रकरण पाचवे - माहिती विश्लेषण

प्रकरण सहावे – निष्कर्ष आणि सूचना

संशोधन पद्धती :

संशोधन प्रक्रियेमध्ये माहिती संकलनासाठी जर्नल्स, मासिके आणि इतर स्त्रोत वापरून साहित्याच्या पुनरावलोकनाने केली जाईल. पुढे, प्रत्यक्ष सर्वेक्षण होण्यापूर्वी अभ्यासाच्या उद्दिष्टे आणि गरजांनुसार तयार केलेल्या प्रश्नांसह एक प्रश्नावली तयार केली जाईल. सर्वेक्षणाच्या मदतीने, माहिती गोळा करणार आणि नंतर प्रमाणीकरणासाठी सारणीबद्ध पद्धतीने माहिती

मांडली जाईल आणि माहितीची तपासणी करण्यात येईल आणि संशोधनाच्या अंतिम टप्प्यात माहितीचे विश्लेषण केले जाईल.

प्राथमिक माहिती :

संधोधन अभ्यास प्राथमिक माहितीवर आधारित आहे. प्राथमिक माहिती ही एक अशा प्रकारची माहिती आहे जी कोणत्याही विद्यमान स्रोतांद्वारे न जाता थेट माहितीच्या स्रोतावरून गोळा केली जाते.

संशोधनाचा अभ्यास करताना संशोधक अशी माहिती गोळा करेल की जी आधीपासून प्रकाशित झालेली नाही. अशा माहितीच्या संकलनासाठी संशोधनाचा उद्देश डोळ्या समोर ठेऊन सर्वसमावेशक प्रश्नावली तयार करण्यात येईल व त्याचबरोबर एस.टी. कर्मचाऱ्यांची मुलाखत घेऊन आणि त्यांच्याशी चर्चा करून माहितीचे संकलन करण्यात येईल.

दुय्यम माहिती :

दुय्यम माहिती म्हणजे प्राथमिक वापरकर्त्यांव्यतिरिक्त इतर कोणीतरी संकलित केलेली माहिती. दुय्यम स्त्रोत म्हणजे,अगोदरच संकलित केलेली माहिती, वार्षिक अहवाल इत्यादींमधून गोळा केलेली माहिती.
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नांदेड जिल्हयाचा माहितीचा समावेश करण्यात येईल व त्यासोबत इंटरनेट, मासिके आणि पाठ्यपुस्तकांच्या माध्यमातून विविध वेबसाइट याचा वापर केला जाईल.

संशोधनाची व्याप्ती :

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ चा अभ्यास खूप विशाल आहे. याची व्याप्ती एस. टी.महामंडळाचे किंमत धोरण,प्रशासन,कर आकारणी, कर्मचाऱ्यांचे उत्पन्न, त्यांचे खर्च, सरकार कर्मचाऱ्यांसाठी राबवत असलेली धोरणे, कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा, कर्मचाऱ्यांची गुंतवणूक, कर्मचाऱ्यांचे उत्पन्नाचे विविध स्त्रोत, कर्मचाऱ्यांना सामाजिक जीवन जगत असताना येणाऱ्या आर्थिक अडचणी व त्यावर उपाय योजना या सर्व बाबीचा समावेश या संशोधन अभ्यासामध्ये आपण करणार आहोत आणि त्यासाठी सोयी आणि व्यवस्थापन क्षमतेसाठी आम्ही नांदेड जिल्हा निवडला आहे. नांदेड विभागातील 8 डेपो मध्ये काम कर्मचाऱ्यांचा अभ्यास आपण या संशोधनामध्ये करणार आहोत. प्रामुख्याने नांदेड विभागातील एस. टी. कर्मचाऱ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीसारख्या पैलूंची चौकशी करणार आहोत आणि त्यांच्या समस्या ओळखणे व त्यावर उपाययोजनांबाबत अभ्यास करणार आहोत.

संशोधनाची मर्यादा :

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ याच्या कर्मचाऱ्यांचा अभ्यास करताना संपूर्ण महाराष्ट्राचा विचार केला तर त्यामध्ये अनेक डेपो आणि लाखो कर्मचारी येतात आणि त्या सर्व डेपो मधील प्रत्येक कर्मचाऱ्यांचा आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे हे कठीण आहे त्यामुळे आपण आपल्या या संशोधन अभ्यासामध्ये महाराष्ट्रातील नांदेड विभागाचा अभ्यास करणार आहोत. नांदेड विभागामध्ये 8 डेपोंचा समावेश होतो, त्यामध्ये भोकर, किनवट, मुखेड, देगलूर, कंधार, हदगाव, बिलोली आणि माहूर इत्यादीचा समावेश होतो. या डेपोतील कर्मचाऱ्यांच्या अभ्यासादरम्यान अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो कारण नांदेड विभागातील सर्वच आठ डेपोंची तपशीलवार माहिती गोळा करणे हि वेळ घेणारी आणि किचकट प्रक्रिया आहे. म्हणून आम्ही संशोधन अभ्यास नांदेड या विभागापुरता मर्यादित ठेवलेला आहे आणि उर्वरित मध्ये गेलेलो नाही.

संदर्भग्रंथसूची:

१ **Patil S. D, (2003) :** “A study of Maharashtra state road transport corporation M S R T C employees in Sangli district”

२ **https://en.wikipedia.org/wiki/Maharashtra_State_Road_Transport_Corporation**

३ **Hatte A. S. (2016) :** “A Study of Job Satisfaction of Maharashtra State Road Transport Corporation Employees in Nanded Division”

४ **https://msrtc.maharashtra.gov.in/**

५ **Dubal U.K. (2014) :** “A study on welfare and recreational facilities in Maharashtra State transport corporation and mmmunicipal transport corporation undertakings in Western Maharashtra”

संशोधक	**संशोधन मार्गदर्शक**
रिंदकवाले अजय बालाजी	**डॉ. एन. एच. आवडे**